दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४०८ वा ● गुरुवार, ता.१८ सप्टेंबर २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००



## जलसंपन्न महाराष्ट्रासाठी 'नदीजोड प्रकल्प' प्रत्येक थेंब पिकांसाठी उपयोगी होईल

**मुंबई । रयत समाचार**

राज्यात सिंचन क्षेत्राचा विस्तार, शेती, उद्योग व घरगुती वापरासाठी दीर्घकालीन जल नियोजन साधण्यासाठी नदीजोड प्रकल्प सुरू करण्याचे ध्येय ठेवण्यात आले आहे. जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी मोठ्या जलप्रकल्पांमुळे शाश्वत विकास, दुष्काळ नियंत्रण आणि संतुलित प्रगती साधता येईल, असे सांगत भविष्यातील जलसमृद्ध महाराष्ट्र घडविण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावे, असे आवाहन केले. राज्यात हाती घेण्यात येत असलेल्या नदीजोड प्रकल्पासंदर्भात गुंतवणूकदारांशी चर्चा करण्यासाठी सह्याद्री अतिथीगृहात आयोजित चर्चासत्रात प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीत मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रविण परदेशी, जलसंपदा विषयक सल्लागार श्रीराम वेदिरे, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव संजय बेलसरे यांसह जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी, बँकर्सचे प्रतिनिधी उपस्थित होते. मंत्री विखे-पाटील यांनी सांगितले की, नदीजोड प्रकल्पांमुळे राज्यातील शेतकरी, उद्योगधंदे तसेच घरगुती पिण्याचे पाणी यासाठी संपूर्ण पाण्याचा सतत पुरवठा सुनिश्चित होईल. या प्रकल्पांमुळे सिंचनक्षेत्राचा विस्तार होईल, दुष्काळाचा धोका कमी होईल आणि प्रत्येक थेंब पिकांसाठी उपयोगी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. राज्यातील जलसंपदा सुधारण्यासाठी हे पाऊल महत्वाचे ठरणार असून, संपूर्ण महाराष्ट्रात जलसंपन्न वातावरण निर्माण करण्यासाठी सर्व स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत.

## नाशिक पोस्ट ऑफिसला देशात पहिल्यांदाच 'आयकॉनिक पोस्ट ऑफिस'चा मान

**नाशिक । रयत समाचार**



नाशिक शहर मुख्य टपाल कार्यालयाचा देशातील पहिल्याच 'आयकॉनिक पोस्ट ऑफिस'मध्ये समावेश झाला असून हा सन्मान मिळवणारे नाशिक पोस्ट ऑफिस देशात अग्रक्रमाने ठरले आहे. केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी यास मंजुरी दिली असून या निर्णयाबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात येत आहेत. जानेवारी २०२५ मध्ये पोस्ट विभागाने देशभरातील पोस्टल सर्कल्सकडून 'आयकॉनिक पोस्ट ऑफिस' निवडीसाठी प्रस्ताव मागवले होते. त्यात फिलॅटेली (टपाल तिकीट संग्राहकत्व) प्रोत्साहनासाठी जास्त वर्दळ असणारी, तसेच फिलॅटेली ब्युरोंचे मानकीकरण करणारी पोस्ट ऑफिसेस विचारात घेण्यात आली. नाशिक पोस्ट ऑफिसमध्ये फिलॅटेली ब्युरो आधीपासून कार्यरत असल्याने या निवडीत नाशिक अग्रस्थानी आले. विशेष म्हणजे, २०२७ मध्ये होणाऱ्या ऐतिहासिक सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकच्या अध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारशाला अधोरेखित करणारे स्मृतिचिन्ह टपाल तिकीट प्रसिद्ध करण्याची मागणी देखील मान्य करण्यात आली आहे. हे तिकीट 'अतुल्य भारत' संकल्पनेतून नाशिकचा जागतिक पातळीवरील लौकिक उंचावणार आहे. नाशिक सिंहस्थ कुंभमेळा हा जगातील सर्वात मोठा धार्मिक-सांस्कृतिक सोहळा असून दरवेळी ५ कोटींहून अधिक भाविक येथे दाखल होतात. या पार्श्वभूमीवर नाशिकला फिलॅटेली हब म्हणून विकसित करण्याची मोठी संधी मिळणार आहे. डाक विभागालाही कुंभमेळ्यात भाविक व पर्यटकांमध्ये फिलॅटेलीचा प्रचार-प्रसार करण्याची संधी साधता येणार आहे. छगन भुजबळ यांनी ता.२८ फेब्रुवारी २०२५ आणि २६ जुलै २०२५ रोजी दूरसंचार मंत्र्यांकडे केलेल्या मागण्यांच्या सकारात्मक प्रतिसादातून नाशिक पोस्ट ऑफिसला मिळालेला 'आयकॉनिक' दर्जा ही नाशिककरांसाठी अभिमानाची बाब ठरली आहे. यामुळे देशभरात नाशिकचे स्थान अधिक उंचावले असून शहराच्या विकासात आणि लौकिकात नवी भर पडणार आहे.

## महाराष्ट्राला तातडीने युरियाचा पुरवठा करा

### कृषिमंत्री भरणे यांची केंद्राकडे मागणी

**मुंबई । गुरूदत्त वाकदेकर**

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना पीक उत्पादनासाठी आवश्यक असलेला युरिया खताचा पुरवठा सुरळीत व्हावा, तसेच आगामी रब्बी हंगामात तुटवडा भासू नये यासाठी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केंद्रीय रसायन व खते मंत्री जे.पी. नड्डा यांना तातडीने युरिया पुरवठ्याबाबत पत्र लिहून मागणी केली. केंद्र सरकारकडून एप्रिल ते जुलै २०२५ दरम्यान राज्याला १०.६७ लाख मेट्रिक टन युरियाचे वाटप करण्यात आले होते. मात्र, त्यापैकी केवळ ८.४१ लाख मेट्रिक टन (७९ टक्के) युरियाच मिळाला. ऑगस्ट महिन्यातील २.७९ लाख मेट्रिक टन वाटपाच्या तुलनेत केवळ ०.९६ लाख मेट्रिक टन (३४ टक्के) युरिया उपलब्ध झाला आहे. त्यामुळे राज्यातील एकूण साठा आता फक्त २.३६ लाख मेट्रिक टनांवर आला असून, हा गेल्या पाच वर्षांतील सर्वात कमी साठा असल्याचे कृषिमंत्र्यांनी पत्रात स्पष्ट केले आहे. कापूस, मका तसेच इतर पिकांसाठी खताची मागणी वाढत असताना उपलब्धतेतील तुटवडा शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे करू शकतो. राज्यातील खरीप हंगामातील पेरणी तब्बल ९८ टक्क्यांपर्यंत पूर्ण झाली आहे. यामध्ये मका लागवडीचे क्षेत्र ५४ टक्क्यांनी वाढून १४.३० लाख हेक्टरवर पोहोचले आहे. त्यामुळे युरियाच्या मागणीत लक्षणीय वाढ झाली असून तातडीने पुरवठा न झाल्यास शेतीचे उत्पादन धोक्यात येऊ शकते, असा इशारा भरणे यांनी दिला आहे. त्यांनी केंद्र सरकारला युरियाचा प्रलंबित पुरवठा तत्काळ करून शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करावे आणि कृषी उत्पादनाचा वेग अबाधित ठेवावा, असे आवाहन केले आहे. तसेच येत्या रब्बी हंगामासाठी प्रस्तावित १२ लाख मेट्रिक टन युरियाला मान्यता द्यावी, अशीही मागणी कृषिमंत्र्यांनी केली आहे.




## व्यापाऱ्यांनी स्वदेशीचा अभिमानाने स्वीकार करावा- मुख्यमंत्री डॉ. सावंत


**पणजी । रयत समाचार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मध्य प्रदेशातील भाषणातील 'स्वदेशी' हाकेला प्रतिसाद देत, गोव्यातील व्यापारी व ग्राहकांनी स्वदेशी वस्तूंना प्राधान्य द्यावे, असे आवाहन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केले. पणजी येथे आयोजित 'सेवा पंधरवडा' कार्यक्रमाच्या उद्घाटनावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास मंत्री, आमदार आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, पंतप्रधानांच्या आत्मनिर्भर आणि स्वयंपूर्ण भारताच्या स्वप्नासाठी स्वदेशी वस्तूंचा पुरस्कार करणे अत्यंत आवश्यक आहे. गोव्यातील व्यापाऱ्यांनी 'आम्ही स्वदेशी माल विकतो' असे अभिमानाने सांगितले पाहिजे. रोजच्या वापरातील वस्तूंमधून ते लक्झरी वस्तूपर्यंत सर्व गोष्टी स्वदेशी असाव्यात. या वस्तूंमधील कष्टांचे मूल्य ग्राहकांनी ओळखले तर त्याचा फायदा देशातील लोकांना थेट होईल. यावेळी मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी महिलांसाठी सुरु केलेल्या योजनांचीही माहिती दिली. 'स्वस्थ नारी सशक्त परिवार' योजनेअंतर्गत राज्यभरातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आणि उपचार, औषधे उपलब्ध करून दिली जातील. तसेच 'मातृ वंदना योजना' अंतर्गत पहिल्या मुलीला जन्म देणाऱ्या मातेला ५ हजार तर दुसऱ्या मुलीला ६ हजार रुपये प्रदान केले जातील. ग्रामीण विकास खात्याद्वारे महिला स्वयं-सहायता गटांना आज ६२ कोटी रुपये कर्ज वितरित करण्यात आले, तर आतापर्यंत राज्यातील ५० हजार महिलांना ३५० कोटींचे कर्ज दिले गेले आहे. याशिवाय वाहन खरेदीसाठी २.१ कोटी आणि इतर निधी स्वरूपात ६ कोटी रुपये कर्ज देण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, मागील काही वर्षांत गोव्याने पायाभूत सुविधांसह अन्य क्षेत्रांत मोठा विकास केला असून, गेल्या ११ वर्षांत यापूर्वी कधीही झाला नसलेला विकास केंद्र आणि राज्यातील भाजपच्या 'डबल इंजिन' सरकारमुळे शक्य झाला आहे.

## १८ ते १९ सप्टेंबर डॉक्टरांचा २४ तासांचा संप; रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी आरोग्यसेवेत ठाम भूमिका

**अहमदनगर । रयत समाचार**

राज्य शासनाने होमिओपॅथी सीसीएमपींना आधुनिक वैद्यक (ॲलोपॅथी) उपचार करण्यास परवाना दिल्याच्या निर्णयाविरोधात इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) अहिल्यानगर शाखेने आंदोलनाची हाक दिली आहे. यानुसार १८ सप्टेंबर गुरुवारी सकाळी ८ वाजेपासून ते १९ सप्टेंबर शुक्रवार सकाळी ८ वाजेपर्यंत डॉक्टरांचा २४ तासांचा संप होणार आहे. अधिक माहिती देताना आयएमए नगर शाखेचे सचिव डॉ. मुकुंद तांदळे यांनी सांगितले, हा संप आमच्या वैयक्तिक अथवा व्यावसायिक फायद्यासाठी नसून रुग्णांच्या




सुरक्षिततेसाठी आहे. ॲलोपॅथीचे अल्प प्रशिक्षण घेऊन कोणालाही आधुनिक पद्धतीने उपचार करण्याचा अधिकार देणे हे धोकादायक आहे. डॉ. तांदळे यांनी स्पष्ट केले की, हा संघर्ष जनतेच्या जीवितरक्षणासाठी आणि भविष्यातील पिढ्यांना सुरक्षित आरोग्यसेवा मिळावी यासाठी आहे. या संपामुळे नागरिकांना थोड्याफार गैरसोयीचा सामना करावा लागू शकतो. मात्र, आयएमएने जनतेला आवाहन केले आहे की त्यांनी या आंदोलनाला नैतिक पाठिंबा द्यावा. आयएमए नगर शाखेच्या या भूमिकेमुळे वैद्यकीय क्षेत्रात चांगलीच खळबळ उडाली आहे. दरम्यान, शासनाने घेतलेल्या निर्णयावर डॉक्टरांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

## पाथर्डीत विदारक परिस्थिती : २३ सप्टेंबरला टाळे ठोको आंदोलनाचा इशारा- खा. लंके




**पाथर्डी । नितीन गटाणी**

पाथर्डी तालुक्यात सध्या ''न भूतो, ना भविष्यती'' अशी विदारक परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नेहमीप्रमाणे कागदी घोडे नाचविण्याऐवजी थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर भरीव मदत जमा करावी, अशी मागणी खासदार निलेश लंके यांनी केली. मदतीबाबत पुढील चार दिवसांत ठोस निर्णय झाला नाही, तर मंगळवारी ता. २३ सप्टेंबर रोजी सर्व शासकीय कार्यालयाबाहेर 'टाळे ठोको आंदोलन' करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला. काल ता.१७ रोजी खासदार लंके यांनी तालुक्यातील पिंपळगाव टप्पा, चिंचपूर इजदे, कुत्तरवाडी, आल्हनवाडी, घुमटवाडी आदी अतिवृष्टीग्रस्त आणि पूरग्रस्त गावांना भेटी दिल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शिवशंकर राजळे, माजी नगरसेवक बंडू पाटील बोरुडे, वैभव दहिफळे, जिल्हा उपाध्यक्ष सिताराम बोरुडे, एसटी बँकेचे संचालक दत्तात्रय खेडकर, एम.पी. आव्हाड, शहराध्यक्ष योगेश रासने, अमोल पाठक, बबलू वावरे, सोमनाथ माने यांच्यासह सरपंच-उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अतिवृष्टीमुळे पिकांचे, शेतीचे, रस्ते, पूल, घरे, दुकाने, पशुधन यांचे प्रचंड नुकसान झाले असून जिवीतहानीची देखील उदाहरणे समोर आली आहेत. तरीदेखील अद्याप नुकसानग्रस्तांना ठोस मदत वा दिलासा जाहीर करण्यात आलेला नाही. नेहमीचे तुटपुंजे निकष बदलून तात्काळ आणि भरीव मदत मिळाली पाहिजे. अन्यथा शेतकरी, व्यापारी, शेतमजूर, महिला-भगिनी व गुरेढोरे यांच्यासह सर्वांनी एकत्र येऊन सरकारी कार्यालयांना टाळे ठोको आंदोलन करून प्रशासनाला जाग आणली जाईल, खणखणीत इशारा खासदार लंके यांनी दिला.

## 'माधुरी' हत्तीणीच्या परतीसाठी निर्णायक पाऊल

**नवी दिल्ली । रयत समाचार**



जिनसेन मठाच्या हक्काची 'माधुरी' हत्तीणी परत मिळविण्यासाठी सुरू असलेल्या लढ्याला आज मोठे यश मिळाले. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सर्व तांत्रिक पूर्तता पूर्ण करून जिनसेन महास्वामीजी यांच्या सहीसह महत्त्वाची कागदपत्रे सादर करण्यात आली आहेत. उद्या ता.१८ रोजी सकाळी उच्चाधिकार समिती (HPC) कडे अधिकृत याचिका दाखल होणार असून, त्यामधून माधुरी हत्तीणीचे पुन्हा नोंदणीसह हस्तांतरण जिनसेन मठाकडे करण्यात यावे, अशी मागणी केली जाणार आहे. 'माधुरी' हत्तीणी केवळ एक जनावर नसून, मठाची परंपरा, सांस्कृतिक वारसा आणि हजारो भाविकांच्या श्रद्धेचे प्रतीक मानली जाते. साधारण दोन दशकांपूर्वी जिनसेन मठात आणलेली ही हत्तीणी अनेक धार्मिक मिरवणुकांत व पारंपरिक विधींमध्ये सहभागी झाली आहे. भाविकांच्या मनाशी घट्ट जोडलेली माधुरी काही वर्षांपूर्वी मठापासून दूर गेली, मात्र तिच्या परतीसाठी सतत प्रयत्न सुरू होते. या पार्श्वभूमीवर सुरू झालेली चळवळ देशभरात गाजत असून, भाविकांचा प्रचंड पाठिंबा मिळवत आहे. सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आल्यानंतर आता सर्वांच्या नजरा उच्चाधिकार समितीच्या निर्णयाकडे लागल्या आहेत. समितीचा निकाल हा या ऐतिहासिक लढ्याचा पुढील टप्पा ठरणार आहे.

## सांबरा विमानतळावर यात्री सेवा दिवस साजरा

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

प्रवाशांना आरामदायी व सुलभ सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने एअरपोर्ट अथॉरिटी ऑफ इंडियाच्या वतीने देशभरात आज ता.१७ सप्टेंबर रोजी यात्री सेवा दिवस साजरा करण्यात आला. या निमित्ताने बेळगावच्या सांबरा विमानतळावर विविध उपक्रमांनी वातावरण उत्साही झाले. कार्यक्रमास खासदार जगदीश शेट्टर व जिल्हाधिकारी मोहम्मद रोशन प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विमानतळ परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. त्याचबरोबर विमानतळावर मोफत वाय-फाय सेवेचा प्रारंभ करण्यात आला. उत्तर कर्नाटकातील सर्वांत जुने असलेले बेळगाव विमानतळ सध्या दिल्ली, मुंबई, बेंगळुरू, हैदराबाद, अहमदाबाद आणि जयपूर अशा महत्त्वाच्या शहरांशी थेट जोडलेले आहे. प्रवाशांच्या स्वागतासाठी पारंपरिक



पद्धतीने तिलक लावून त्यांचे आगमन साजरे करण्यात आले. यात्री सेवा दिवसानिमित्त रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, विद्यार्थ्यांसाठी बौद्धिक स्पर्धा तसेच सांस्कृतिक कार्यक्रम यांचे आयोजन करण्यात आले. विमानतळ संचालक एस. त्यागराजन यांनी या सर्व उपक्रमांची माहिती दिली. बेळगावकर प्रवाशांना सोयीसुविधांची नवी भेट मिळाल्याने समाधान व्यक्त होत आहे.

## शिवकालीन रणरागिणींच्या स्मृती जागवणारा प्रेरणादायी सोहळा

### श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल, मराठी साहित्य व कला सेवा यांचा संयुक्त कार्यक्रम

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील रणरागिणींचा पराक्रम आणि स्त्रीशक्तीची परंपरा नव्या पिढीपुढे उभी करण्यासाठी श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल आणि मराठी साहित्य व कला सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने दादरच्या श्री शिवाजी मंदिर नाट्यमंदिरात वार्षिक सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थित प्रेक्षकांना आनंद दिला. प्रसिद्ध इतिहास अभ्यासक-लेखक प्रवीण भोसले यांनी प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, शिक्षणाचा उपयोग केवळ प्रमाणपत्रापुरता न राहता दैनंदिन आयुष्यात आणि आवडीच्या क्षेत्रात कर्तबगारी दाखवण्यासाठी करावा. शिवरायांचे आठवावे रूप, आठवावा प्रताप, असे म्हणताना इतिहासाच्या पानांवर कोरलेल्या रणरागिणी डोळ्यासमोर येतात. मातोश्री जिजाबाई, महाराणी येसूबाई, ताराराणी, यलम्मा, पुण्यश्लोक अहिल्याबाई, विरांगणा रायबागन या स्त्रिया भावनांवर विजय मिळवत प्रत्येक आव्हानाला सामोरे जात होत्या. त्या स्वराज्यसेवक वीरांचा आधार




होत्या आणि अप्रत्यक्षपणे स्वराज्यासाठी लढत होत्या. आजही स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात पुढे आहेत. तुम्हीही त्यांचा आदर्श घ्यावा. विशेष पाहुणे म्हणून उपस्थित एनएसजी कमांडो नरेश पवार यांनी आपल्या लष्करी अनुभवांची माहिती दिली. ते म्हणाले, पठाणकोट हल्ला, जम्मू-काश्मीरमधील कारवाया, पुंछ येथे बॉर्डरपार ऑपरेशन सलग तीन वर्षे पाकिस्तानविरोधात कार्य करताना आम्ही अनेक संकटांना सामोरे गेलो. नुकतेच यशस्वी झालेले सिंदूर ऑपरेशन जाहीर करणाऱ्या कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग या दोन धाडसी महिला होत्या. घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग सैन्यदलासाठीही करता येतो, त्या दृष्टीने प्रयत्न करावेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे सिद्धांत समाजकार्याचा पाया ठरावेत, या ध्येयाने कार्य करणाऱ्यांना दिला जाणारा सुभेदार वीर तानाजी मालुसरे सन्मान पुरस्कार २०२५ मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे अध्यक्ष आणि इतिहास अभ्यासक रवींद्र मालुसरे यांना प्रदान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ते म्हणाले, स्वराज्य हे शहाजी राजे आणि राजमाता जिजाऊ माँसाहेब यांचे स्वप्न होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी ते सत्यात उतरवले, संभाजी महाराजांनी त्याचा विस्तार केला. या यज्ञात असंख्य मावळ्यांनी प्राणांची आहुती दिली. त्यांच्या बलिदानामुळे महाराष्ट्र धर्म काय असतो हे जगाला कळाले. या इतिहासाचा विसर मराठी माणसाला पडता कामा नये. संस्थेचे प्रमुख डॉ. हेमंतराजे गायकवाड यांनी संस्थेचे योगदान अधोरेखित करताना म्हणाले, बारावीनंतर मुलींनी स्वावलंबी व्हावे, ही संकल्पना घेऊन मी डॉ. गायकवाड इन्स्टिट्यूट सुरू केले. आज ते पॅरामेडिकल क्षेत्रात देशभरात महत्त्वाचे स्थान मिळवून आहे. कठोर शिस्तीमुळे अनेक मुली माझ्यावर बापासारखा विश्वास ठेवतात. तसेच, छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनकार्य देशातील विविध भाषांमध्ये पोहोचवण्यासाठी त्यांनी श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनलची स्थापना केली असल्याचेही त्यांनी सांगितले. सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित राज्यस्तरीय शिवकालीन रणरागिणी निबंध स्पर्धेतील विजेत्यांना गौरविण्यात आले. डॉ. अनुज अविनाश केसरकर, मुंबई (प्रथम क्रमांक रोख रुपये ५,०००), प्रा. प्रशांत पुंडलिक शिरुडे, ठाणे (द्वितीय क्रमांक रुपये ३,०००), सुमिता अभिषेक पवार, मुंबई (तृतीय क्रमांक रुपये २,०००), स्नेहल गोविंद चव्हाण, रत्नागिरी आणि हिमांशू विजय शुक्ल, जळगाव (उत्तेजनार्थ प्रत्येकी रुपये १,०००) यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. सोहळ्याचे सूत्रसंचालन मराठी साहित्य व कला सेवाचे संस्थापक अध्यक्ष गुरुदत्त वाकदेकर, युक्ता गोठणकर आणि आरती लोखंडे यांनी केले. आर्णा सुर्वे, साक्षी निर्मल, गौरव गायकवाड, समिक्षा बिळीगुदरी आणि साहिल धाकतोडे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# मोदींच्या नेतृत्वाखाली भारत विश्वगुरु बनेल- आ.जगताप

## प्रधानमंत्री मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त मेगा रक्तदान शिबिर



**अहमदनगर । रयत समाचार**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त जैन श्वेतांबर तेरापंथी उपसभा आणि अखिल भारतीय तेरापंथ युवा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात मेगा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. ‘रक्तदान अमृत महोत्सव २.०’ या अभियानांतर्गत आयोजित या उपक्रमात नगरकरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून सेवाभावी भावनेचे दर्शन घडविले.

या उपक्रमात आनंदऋषी हॉस्पिटल रक्तपेढी, जनकल्याण रक्तपेढी, हेल्पिंग हँड्स फॉर हंगर्स संस्था, व्यापारी संघटना तसेच भाजप शहर जिल्हा सर्व सेल व विविध सामाजिक संस्थांचा सहभाग होता. शिबिराचे मुख्य आयोजन भाजपा जैन प्रकोष्ठ सेलचे राज्य सचिव व केंद्रीय मध्य रेल्वे सल्लागार समिती सदस्य सुदर्शन डुंगरवाल आणि प्रकाश बच्छावत यांनी केले. कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप व भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्या हस्ते झाले. यावेळी नगरसेवक निखिल वारे, मीनाताई मुनोत, सीए ज्ञानेश्वर काळे, बाबासाहेब सानप, सुवेंद्र गांधी, वसंत राठोड, प्रल्हाद गीते, संतोष गांधी, महेश गुगळे, चेतनजी संचेती, आशिष खंडेलवाल, नरेंद्रजी तोमर, योगेश मुथा, विपुल शेटीया, कमलेश भंडारी, मुकुल गंधे, हर्षल बोरा, गोपाल वर्मा, दर्शन गांधी आदी मान्यवर उपस्थित होते. आमदार संग्राम जगताप म्हणाले की, ‘‘पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला नवा आत्मविश्वास दिला आहे. अखंड भारताची संकल्पना पूर्ण करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली भारताला विश्वगुरु बनविण्याचे स्वप्न नक्कीच साकार होईल. रक्तदान शिबिरात नागरिकांचा मोठा सहभाग ही समाजातील ऐक्याची जाणीव करून देणारी बाब आहे.’’ भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते म्हणाले की, ‘‘मोदीजींचा वाढदिवस रक्तदानासारख्या समाजोपयोगी उपक्रमाने साजरा होणे म्हणजे खरी देशसेवा आहे. युवकांचा सहभाग उल्लेखनीय असून या उपक्रमाचे श्रेय सुदर्शन डुंगरवाल यांच्या नियोजनाला जाते.’’ सुदर्शन डुंगरवाल यांनी म्हटले की, ‘‘पंतप्रधान मोदींनी ‘सेवा हीच संघटना’ हा संदेश दिला आहे. रक्तदान शिबिरातून असंख्य रुग्णांचे प्राण वाचतील. रक्तदान ही खरी जीवनदानाची क्रांती आहे आणि मोदीजींच्या कार्यपद्धतीशी एकनिष्ठ राहण्याचा हा मार्ग आहे.’’ या शिबिरात मोठ्या संख्येने नागरिकांनी रक्तदान केले. सूत्रसंचालन आर. जे. चैत्राली जावळे यांनी केले तर आभार मीनाताई मुनोत यांनी मानले.



# राजकारणापेक्षा सामाजिक कार्याला प्राधान्य – सुनिल त्र्यंबके

## तवलेनगरमध्ये मंदिर परिसर सुशोभीकरण कामाचा आरंभ

**अहमदनगर । विजय मते**

‘‘प्रभागातील नागरिकांची कामे करताना कधीही दुजाभाव केला नाही. रस्ते, ड्रेनेज, स्ट्रीट लाईट, पाणीपुरवठा यांसारख्या मुलभूत प्रश्नांसोबतच ओपन स्पेसमधील मंदिरे व उद्यानांसाठीही निधी उपलब्ध करून दिला. राजकारण हे पाच वर्षांचे असते, परंतु सामाजिक कार्य लोकांच्या जीवनात कायमस्वरूपी ठसा उमटवते,’’ असे प्रतिपादन माजी नगरसेवक सुनील त्र्यंबके यांनी केले. प्रभाग क्रमांक दोन मधील तवले नगर येथील विठ्ठल-रुक्मिणी व मारुती मंदिर परिसर सुशोभीकरण कामाचा शुभारंभ श्रीफळ वाढवून श्री. त्र्यंबके यांच्या हस्ते झाला. या प्रसंगी माजी नगरसेवक बाळासाहेब पवार, निखिल वारे, विनीत पाऊलबुधे, आकाश त्र्यंबके, ॲड. रमेश कराळे, ॲड. रणजीत गोरे, बापूसाहेब जंगले, अरविंद देशपांडे, नवनाथ टिमकरे, अनिल जाधव, नवनाथ गर्जे, शंकर वाघ, सारंग पिपाडा, अक्षय भिसे, महादेव डमाळे, अक्षय कराळे, राहुल बुधवंत, आदित्य देशपांडे, डॉ. रामकिसन सासवडे, सुरज कनोजीया, प्रवीण टीमकरे, निखिल जंगले, सुनील खडके यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री. त्र्यंबके पुढे म्हणाले की, ‘‘प्रभागातील विकासकामांसाठी आमदार संग्राम जगताप यांनी मोठा निधी उपलब्ध करून दिला. माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी देखील जास्तीत जास्त निधी देऊन कामांना चालना दिली. मंदिर परिसरात पेविंग ब्लॉक, कंपाऊंड वॉल व सिमेंट कॉंक्रीट कामे पूर्ण झाल्यावर परिसराचे वैभव अधिक खुलून दिसेल.’’ यावेळी मनोगत व्यक्त करताना बाळासाहेब पवार, निखिल वारे, विनीत पाऊलबुधे यांनी सांगितले की, ‘‘नागरिकांचे सहकार्य मिळाल्यामुळेच विकासकामे सुरळीत पार पडतात. आम्ही लक्ष ठेवतो, पण नागरिकांनीही दर्जा तपासावा व सूचना द्याव्यात, त्यामुळे दर्जेदार कामे होण्यास मदत होते.’’ प्रास्ताविकात ॲड. रमेश कराळे म्हणाले की, ‘‘या परिसरातील बहुतांशी कामे चारही नगरसेवकांनी मिळून पूर्ण केली असून, मंदिर परिसरातील कामे लवकरच पूर्ण होतील. याचा फायदा भाविक व नागरिकांना होईल.’’ कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी सर्व माजी नगरसेवकांचे आभार मानले.



# मुकुंदनगरमधील खेळाडूंचे ऑल इंडिया कराटे स्पर्धेत यश

**अहमदनगर । रयत समाचार**

बारामती येथे पार पडलेल्या ऑल इंडिया कराटे स्पर्धेत नगर शहरातील मुकुंदनगर उपनगरातील खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर आपली चमकदार छाप उमटवत मोठे यश संपादन केले. खेळाडूंनी सुवर्ण, रौप्य आणि कांस्य अशी बहुमोल पदके पटकावून जिल्ह्याचा मान उंचावला. या स्पर्धेत इब्राहीम शेख, हंझाला शेख, अली शेख आणि हुसेन शेख यांनी प्रभावी खेळ करत सुवर्णपदक मिळवले. तर अरसलान सय्यद, सफुरा शेख, महेक पठाण आणि आरिझ शेख यांनी दमदार लढती देत रौप्य पदकाची कमाई केली. नगरच्या इतर खेळाडूंनी कांस्यपदक जिंकत क्रीडा परंपरेत भर घातली. कांस्यपदक विजेत्यांमध्ये झारा आंबेकर, दुआ शेख, हुसेन चौधरी, अर्शिया पठाण, अहमद शेख, अरीबा शेख, हफसा शेख, नश्रा इनामदार, राजिक शेख, सौद शेख, इरम खान, मुस्तफा शेख, युसुफ सय्यद, उमर शेख, हुजेर शेख, अब्दुल्ला सय्यद, अब्दुलरहमान सय्यद, झैद शेख, तमीम सय्यद, ऐमन शेख, अरकम सय्यद, तुबा पठाण, झारा शेख, इब्राहीम जावेद शेख, इंशा सय्यद, आरिझ सय्यद, मुशफिरा शेख, मुफिझ शेख, क्रिस्टीना सालवे, मोआझ शेख, युसरा सय्यद, ओम वाघ, नुरैन शेख आदींचा समावेश आहे. या विजयानंतर युथ कराटे फेडरेशनचे मार्गदर्शन व कोच सबिल सर आणि साहिल सर यांचे मोलाचे योगदान अधोरेखित झाले. प्रशिक्षक सुजित हजारे, अजीम सय्यद आणि ओम वाघ यांनीही खेळाडूंना कसून प्रशिक्षण दिले. स्पर्धेला शिहान मिनानाथ भोकरे व आंतरराष्ट्रीय कराटेपटू प्रणय शर्मा उपस्थित होते. तसेच कराटे इंडिया ऑर्गनायझेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष भारत शर्मा यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे खेळाडूंचे अभिनंदन केले. मुकुंदनगरातील खेळाडूंच्या या अभूतपूर्व यशामुळे नगर जिल्ह्यात उत्साहाचे वातावरण असून सर्व स्तरांतून विजेत्यांचे अभिनंदन होत आहे.

# नगरमध्ये रंगणार कुमार म्युझिकल नाईट



**अहमदनगर । अबीद खान**

संगीत क्षेत्रात नावाजलेल्या गाता रहे मेरा दिल ग्रुपतर्फे हेमंत कुमार, किशोर कुमार, अमित कुमार, शब्बीर कुमार, कुमार सानू या लोकप्रिय गायकांच्या गीतांची महफिल ‘‘कुमार म्युझिकल नाईट बड़े अच्छे लगते हैं’’ शुक्रवारी (दि. १९ सप्टेंबर २०२५) रोजी सायंकाळी ७ वाजता सर्जेपुरा येथील रहेमत सुलतान सभागृहात रंगणार आहे. याबाबतची माहिती आयोजक ॲड. अमिन धाराणी यांनी दिली. या गीत महफिलीत नरेश पेवाल, गुलशन धाराणी, चारु ससाणे, दीपा भालेराव, संजय भिंगारदिवे, माधवी गुजर, डॉ. उमेश सुद्रिक, रज्जाक शेख, पंढरीनाथ लांडगे, संतोष सूर्यवंशी, मुख्तार शेख व अमिन धाराणी आपली गाणी सादर करणार आहेत. विशेष आकर्षण म्हणून जीवन महाजन माउथ ऑर्गनवर सुरेल धून सादर करतील, अशी माहिती ॲड. गुलशन धाराणी यांनी दिली. या कार्यक्रमास प्रवेश सर्वांसाठी विनामूल्य असून वेळेवर सुरुवात होणार आहे. त्यामुळे नगरच्या रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आबिद खान यांनी केले आहे.



# मुसळधार पावसात मोबाईल नेटवर्क ठप्प, संघटनेच्या तत्परतेने सेवा पुन्हा सुरू

**अहमदनगर । रयत समाचार**

गेल्या दोन दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे नगर जिल्ह्यात जनजीवन विस्कळीत झाले. रस्त्यांवर पाणी साचले, विजेचे खांब कोसळले, शेतीचे मोठे नुकसान झाले. याचबरोबर अनेक भागांतील मोबाईल टॉवरमध्ये बिघाड झाल्याने दूरसंचार सेवा ठप्प झाली होती. अचानक खंडित झालेल्या या सेवेमुळे नागरिकांचा एकमेकांशी संपर्क तुटला होता. अशा परिस्थितीत महाराष्ट्र मोबाईल टॉवर तांत्रिक कामगार संघटनेने पुढाकार घेत युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम सुरू केले. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजी शिंदे यांच्या आदेशानुसार पाथर्डी, शेवगाव, कर्जत, जामखेड आदी भागांत पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. पाण्यात बुडालेल्या टॉवरपाशी प्रत्यक्ष उभे राहून दुरुस्ती करण्याचे काम पदाधिकाऱ्यांनी हाती घेतले. या मोहिमेत युनियनचे सचिव उमाकांत सोनवणे, राहुल पुंड, जिल्हाध्यक्ष रफिक शहा, सुनील महाजन, भरत झेंडे, प्रसाद तरवडे, गणेश वाघ, विजय भापकर, उद्धव काळदाते, सिद्धार्थ थोरात, विजय जराड, सचिन पवार, हरीभाऊ लोखंडे, प्रवीण बडे, योगेश साबळे आदी पदाधिकाऱ्यांचा सहभाग होता. अनेक टॉवर अजूनही पाण्यात असले तरी अथक परिश्रम करून काही तासांत सेवा पूर्ववत करण्यात आली. यामुळे दूरसंचार सेवा पुन्हा सुरू झाल्याने नागरिकांना दिलासा मिळाला. विशेष म्हणजे पावसाच्या प्रतिकूल परिस्थितीतही कर्मचाऱ्यांनी धोक्याची पर्वा न करता तत्परतेने सेवा बजावली.

# एकल महिलांचा पुनर्विवाह राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा

**अहमदनगर । रयत समाचार**



साऊ एकल महिला समिती व जगदंब फाऊंडेशन संचलित मराठी सोयरीक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने एकल महिला व पुरुषांसाठी मोफत राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा शनिवार, दि. २० सप्टेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ७ वाजता ऑनलाईन पद्धतीने गुगल मीटवर होणार असल्याची माहिती समितीचे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी, जगदंब फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश लंघे व मराठी सोयरीक संस्थेच्या संचालिका जयश्री अशोक कुटे यांनी दिली. मेळाव्यात सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी १९ सप्टेंबरपर्यंत ८४५३९०२२२२ या क्रमांकावर मोफत नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी केलेल्यांनाच मेळाव्याच्या दिवशी गुगल मीटची लिंक पाठवण्यात येईल. त्यानंतर उमेदवारांना ऑनलाईन सामील होऊन स्वतःचा परिचय द्यायचा आहे. विशेषतः जे पुरुष एकल महिलांच्या मुलांचा स्वीकार करण्यास तयार आहेत, अशा पुरुषांनाच मेळाव्यात सहभागी होण्याची परवानगी आहे, असे स्पष्ट करण्यात आले आहे. संस्थेच्या वतीने पुनर्विवाह नाव नोंदणी अभियान कायम सुरू असून, इच्छुकांनी कधीही वरील क्रमांकावर संपर्क करून नाव नोंदणी करता येते. नोंदणीनंतर संबंधितांना पुनर्विवाहाच्या व्हॉट्सॲप गटात समाविष्ट केले जाते, ज्यातून त्यांना योग्य स्थळे पाहायला मिळतात. संस्थेच्या माध्यमातून राज्यभरात आतापर्यंत ५७ एकल महिलांचे पुनर्विवाह लावले गेले असून, त्यामध्ये महिलांच्या मुलांचा पुरुषांनी स्वीकार केलेला आहे. साऊ एकल महिला समिती गेल्या सहा वर्षांपासून एकल महिलांसाठी भरीव सामाजिक कार्य करत आहे. इच्छुकांनी १९ सप्टेंबरपर्यंत ८८४७७२४६८० या क्रमांकावर नावनोंदणी करावी, असे आवाहन पारुनाथ ढोकळे, मनोज सोनवणे, नानासाहेब दानवे, सागर मोरे, कल्पना निकम (संभाजीनगर), अनिता कांबळे (बीड), मयूर बागुल, वनिता हजारे (पुणे), नलिनी सोनवणे (नाशिक), कविता बोंबले, मंगल काळे (खेड) यांनी केले आहे.


## रयत समाचार Classified छोटी जाहिरात

### छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री | नोकरी विषयक | नावात बदल
आरोग्य विषयक | वाढदिवस | विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# श्रीरामपूर बाजार समितीला राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार

## शेतकरी व्यापाऱ्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव

**बेलापूर । शफीक बागवान**

श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीस राज्यस्तरावरील प्रथम क्रमांकाचा वसंतदादा पाटील स्मृती पुरस्कार मिळाला असून कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आजपर्यंतच्या इतिहासात हा सर्वोच्च असा बहुमान समजला जात आहे. महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्यादित, पुणे यांच्या ५६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत राज्यातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या वेगवेगळ्या बाजार समित्यांना पुरस्काराने गौरविण्यात आले.

नाशिक विभागातून अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर कृषि उत्पन्न बाजार समितीने उत्कृष्ट कामगिरी करत हा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळवून आपल्या कार्याचा राज्यभर ठसा उमटविला आहे. उत्कृष्ट कामगिरी, पारदर्शक कारभार आणि शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देणाऱ्या बाजार समित्यांचा सखोल आढावा घेऊन हा मानाचा पुरस्कार जाहीर करण्यात आला. महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे अध्यक्ष बाळासाहेब नाहटा, उपाध्यक्ष सुर्यवंशी, संचालक ॲड. सुधीर कोठारी यांच्या हस्ते श्रीरामपूर बाजार समितीला हा सन्मान प्रदान करण्यात आला. श्रीरामपूर बाजार समितीचे सभापती सुधीर नवले, समितीचे माजी सभापती सचिन गुजर, सदस्य सोन्याबापू शिंदे, दशरथ पिसे, राजेंद्र पाऊलबुद्धे, मयुर पटारे , राजूभाऊ चक्रनारायण, विलास दाभाडे सचिव साहेबराव वाबळे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.




**कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक, कर्मचारी, व्यापारी आणि शेतकरी बांधवांचे आभार मानत पुढील काळात शेतकऱ्यांच्या हितासाठी अधिक उपयुक्त व नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्याचा बाजार समितीचा संकल्प असल्याचे सभापती सुधीर नवले आणि सचिव साहेबराव वाबळे म्हणाले.**

आमदार हेमंत ओगले, माजी आमदार भानुदास मुरकुटे तसेच जिल्हा बँकेचे संचालक करण ससाणे यांच्या मार्गदर्शनानुसार श्रीरामपूर बाजार समितीने मागील काही वर्षांत शेतकऱ्यांच्या मालाला योग्य दर मिळावा, शेतमालाची आधुनिक बाजारपेठ उभारणी, डिजिटल बोली प्रणाली, शेतकऱ्यांना त्वरित देयकांची हमी, स्वच्छ आणि सुव्यवस्थित बाजार परिसर अशा अनेक उपक्रमांद्वारे आदर्श कामगिरी बजावली आहे.



# सोसायटी ही शेतकऱ्यांची कामधेनू, गावाच्या विकासाचा आधारस्तंभ– पै. डोंगरे

## निमगाव वाघा सोसायटीच्या नवनिर्वाचित चेअरमन, व्हा. चेअरमनचा सत्कार

**नगर तालुका । रयत समाचार**

निमगाव वाघा (ता. नगर) विविध कार्यकारी सोसायटीचे नवनिर्वाचित चेअरमन अतुल फलके व व्हाईस चेअरमन संजय डोंगरे यांचा स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या वेळी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमास अंबादास दूध डेअरीचे चेअरमन भाऊसाहेब जाधव, वैभव पवार, किरण ठाणगे, नवनाथ होले, मेजर शिवाजी पुंड, पोपट भगत, राजेंद्र शिंदे, युवा मंडळाचे अध्यक्ष पै. संदीप डोंगरे, उत्तम निमसे आदी मान्यवर उपस्थित होते. पै. नाना डोंगरे म्हणाले की, ''सोसायटी ही शेतकऱ्यांची खरी कामधेनू आहे. सहकारी चळवळीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी दूर करून त्यांना स्वावलंबी बनविता येते. सोसायटीतून गावाच्या विकासासाठी अनेक योजना राबविता येतात. शेतकऱ्यांचा विकास झाला तर गाव आपोआप प्रगतिपथावर जाईल. चेअरमन अतुल फलके व व्हाईस चेअरमन संजय डोंगरे यांच्याकडे विकासाची दृष्टी असून त्यांच्या नेतृत्वामुळे सोसायटीचे कार्य अधिक पारदर्शक व शेतकरीहिताचे होईल.'' नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या सत्कारामुळे सोसायटीत व गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्या

## भारतीय कम्युनिस्ट पक्ष व किसान सभेची मागणी

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

राज्यातील बहुतांश जिल्ह्यांत गेल्या दोन–तीन दिवसांत झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी व शेतीपूरक व्यवसायांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत शासनाने तातडीने पंचनामे करून सर्व शेतकऱ्यांना सरसकट नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्ष व किसान सभेच्या वतीने तहसीलदार शेवगाव यांच्याकडे करण्यात आली. यावेळी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्यसचिव कॉ. ॲड. सुभाष लांडे म्हणाले की, अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या कांदा चाळ्यांमध्ये पाणी शिरले असून, चाळीतील कांदा व अन्नधान्य वाहून गेले आहे.




जनावरांचा चारा, धान्याची नासाडी झाली असून शेतीपूरक औजारे, उपकरणे वाहून गेली आहेत. फळबागा तसेच उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काही भागांत शेतजमिनी, राहती घरे व जनावरांचे गोठेही वाहून गेले आहेत.

त्यामुळे शेतकरी वर्ग गंभीर संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर सर्वांना कोणताही भेदभाव न करता तातडीची सरसकट नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदन तहसीलदार आकाश दहाडदे यांना देण्यात आले. यावर कॉ. संदीप इथापे, कॉ. भगवानराव गायकवाड, बापूराव राशिनकर, ॲड. भागचंद उकिरडे, राम लांडे, गोरक्षनाथ काकडे व विष्णू गोरे यांच्या सह्या आहेत.

# संत शेख महंमद महाराज औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा पदवीदान समारंभ

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा शहरातील श्री संत शेख महंमद महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे आयोजित पदवीदान समारंभ अत्यंत उत्साहात व सन्मानपूर्वक पार पडला. या समारंभाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री व लोकनेते बबनराव पाचपुते यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग तसेच व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. समारंभात विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण पदविका प्रदान करण्यात आल्या. पदविका वितरण प्रसंगी मार्गदर्शन करताना माजी मंत्री पाचपुते म्हणाले की, ''केवळ शैक्षणिक पदवीच नव्हे तर व्यावहारिक कौशल्य ही यशाची खरी गुरुकिल्ली आहे. औद्योगिक प्रशिक्षणाच्या माध्यमातून तरुणांनी स्वतःचा व्यवसाय सुरू करून रोजगारनिर्मिती करावी आणि देशाच्या प्रगतीत आपला वाटा उचलावा.'' या सोहळ्याला प्राचार्य सोमनाथ जाधव, संस्था व्यवस्थापन समिती अध्यक्ष जयकुमार मनोज, भाजपा तालुकाध्यक्ष विक्रम भोसले, सदस्य नंदकुमार गाडेकर, भाजपा अहिल्यानगर दक्षिणचे निमंत्रित सदस्य राजेंद्र उकांडे, नगरसेवक संजय खेतमाळीस, युवा कार्यकर्ते संदीप हिरडे यांच्यासह सर्व शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या भाषणात औद्योगिक शिक्षण, कौशल्य विकास आणि तरुणांच्या सक्षमीकरणावर भर दिला. ''या प्रशिक्षण संस्थांमधून केवळ नोकरीसाठी नव्हे तर उद्योजक घडवले जातात,'' असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. समारंभात शेडगाव, पारगाव, श्रीगोंदा, वडाळी परिसरातील विविध ट्रेड्समधून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पदविका प्रदान करण्यात आली. अनेक पालकांनीही कार्यक्रमाला उपस्थित राहून आपल्या पाल्याचा गौरव अनुभवला.



# पिंपळगाव माळवी तलावात पाण्याची आवक सुरु



**नगर तालुका । रयत समाचार**

मागील दोन दिवसांपासून झालेल्या परतीच्या पावसामुळे सीना व खारोळी नद्यांना आलेल्या पुरामुळे नगर तालुक्यातील पिंपळगाव माळवी तलावात नव्याने पाण्याची आवक सुरू झाली आहे. या पाण्यामुळे परिसरातील नागरिकांना दिलासा मिळाला आहे. अहिल्यानगरपासून १६ किमी अंतरावर ७०० एकर क्षेत्रात पसरलेला हा तलाव ब्रिटिश काळात १९२० साली शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी बांधण्यात आला होता. १९९० पर्यंत नगर शहराला या तलावातून सुरळीत पाणीपुरवठा होत होता. त्यानंतर पुरवठा बंद झाल्यानंतर शेतकऱ्यांना तात्पुरत्या स्वरूपात शेतीसाठी पाणी घेण्याची परवानगी देण्यात आली होती. जानेवारीपासून तलाव कोरडा पडला होता. या तलावावर पिंपळगाव माळवी, जेऊर, डोंगरगण, मांजरसुंभा या गावांच्या पाणी योजनांचा आधार आहे. आता तलावात नव्याने पाण्याची आवक सुरू झाल्याने परिसरातील पिण्याचे तसेच शेतीसाठीचे पाणी संकट मोठ्या प्रमाणात दूर होणार असून ग्रामस्थांत आनंद व्यक्त केला जात आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत चिंचोडी पाटील येथे तालुकास्तरीय कार्यशाळा



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायतराज विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत तालुकास्तरीय कार्यशाळा न्यू इंग्लिश स्कूल, चिंचोडी पाटील येथे यशस्वीपणे पार पडली. या कार्यशाळेस श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघाचे आमदार विक्रमदादा पाचपुते उपस्थित राहिले. त्यांनी ग्रामविकास अधिकारी, सरपंच, ग्रामसेवक व पंचायत प्रतिनिधींना ग्रामपंचायतींच्या सशक्तीकरणासाठी मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात आमदार पाचपुते यांनी योजना अंमलबजावणी, निधीचा प्रभावी व पारदर्शक वापर, डिजिटल गव्हर्नन्स आणि उत्तम प्रशासकीय प्रक्रिया या विषयांवर सविस्तर माहिती दिली. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी जबाबदारीने आणि झपाट्याने काम करण्याचे आवाहन त्यांनी पंचायत प्रतिनिधींना केले. या कार्यशाळेला पारनेर–नगरचे आमदार काशीनाथ दाते, पंचायत समिती सदस्य, पदाधिकारी, सरपंच, ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या मार्गदर्शनामुळे प्रतिनिधींना शासनाच्या विविध योजनांची माहिती मिळाली असून, ग्रामपंचायतींच्या भविष्यातील कार्यप्रणालीसाठी ही कार्यशाळा उपयुक्त ठरल्याचे उपस्थितांनी सांगितले.

# अशोक कारखान्याची मुरकुटे यांनी केली खाटी गाय- जितेन्द्र भोसले

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

अशोक कारखान्यावर ४५० कोटीचे कर्ज, कामगारांचे आठ महिन्यांचे थकविलेले वेतन, निवृत्त कामगारांच्या ग्रॅज्युइटी थकीत या सर्व स्थितीमुळे अशोक कारखाना कामधेनुची भानुदास मुरकुटेंनी खाटी गाय केली आहे. ऊस द्या, असे कारखाना सभासदांकडे आवाहन करण्याची वेळ का आली याचे आत्मपरिक्षण करावे, असे आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जितेन्द्र भोसले यांनी केले आहे. मुरकुटे हे सी.ए. असून कारखान्याचे चेअरमन आहेत. अशोक कारखाना गणेश इतकाही भाव देत नाही. गणेश कारखान्याने १९८८पासूनचे कामगारांचे देनी चुकती केली तर अशोकच्या व्यवस्थापनाने कामगारांचे वेतन थकविले. त्यांचे २५ टक्के पगार कपात सुरु केली. ऊस तोडणी मजूर, वाहतुकदार, व्यापारी यांचे कोट्यावधी रुपयांची देणेही थकविले. अनावश्यक गाळप, डिस्टीलरी, इथेनॉल प्रकल्पांची क्षमतावाढ करुन कारखाना ४५० कोटी इतका कर्जबाजारी करुन ठेवला. आता परत ९०० टनाची गाळप क्षमतावाढ प्रस्तावित केली आहे. हा प्रकार म्हणजे ''खिशात नाही आणा तरी मला पाटील म्हणा'' असा असल्याची टिका भोसले यांनी केली.



दारुचे कारखानदार जास्त दर देऊ शकतात मग कारखान्याकडेही देशी दारू वगळता सर्व प्रकल्प आहेत. सभासदांना कबूल करूनही भाव का देऊ शकत नाही याचे उत्तर भानुदास मुरकुटे यांनी द्यावे. शैक्षणिक संस्थांसाठी सभासदांकडून एक रुपयाही घेतला नाही म्हणणाऱ्या मुरकुटेंनी सभासदांच्या ऊस बिलातून कपात केलेला भाग विकासनिधी गेला कुठे असा सवाल भोसले यांनी केला आहे.

स्व.गोविंदराव आदिक पाटबंधारे मंत्री असताना खानापूर व भेर्डापूरचे कोल्हापूर पध्दतीचे बांधारे (के.टी वेअर) झाले. त्यानंतर स्व.दौलतराव पवारांनी पाणी प्रश्न धसास लावला. भांडारदराचे पाणीवाटप करुन तालुक्याला ५२ टक्के शाश्वत पाणी मिळवून दिले. ज्या स्व.ससाणे साहेबांच्या आमदारकीच्या काळात समन्यायी पाणी वाटपाचा काळा कायदा झाला म्हणून मुरकुटे खडे फोडायचे त्यांचे गटाशी सत्तेसाठी हातमिळवणी केली. ज्या माजी आ.कांबळेंच्या काळात ब्लॉक रद्द झाले त्यांच्या मांडीला मांडी लावून मुरकुटे बसत आहेत. गेली ३५ वर्षात पाटपाण्याची अडचण आली नाही, गोदावरी व प्रवरा नदीवरील बंधारे दोनदा भरले जातात. तेव्हा मुरकुटेंनी पाणी प्रश्नाचे भांडवल करुन धुळफेक करणे थांबवावे, असेही भोसले म्हणाले. अशोक कारखान्याला कर्जबाजारी करुन मौज करणाऱ्या अशोक कारखान्याच्या व्यवस्थापनाने गणेश कारखान्याचा आदर्श घेवून मागील हंगामाचे प्रतिटन ३०० रुपये व सन २३–२४ हंगामाचे २००रु. असे ५०० रुपये पेमेंट दस–यापूर्वी अदा करावे.कामगार हे सभासद आणि सभासदांची मुले आहेत. कामगार व निवृत्त कामगारांचे थकीत देणे अदा करावे. अन्याय सहन करणाऱ्या सभासद, ऊसउत्पादक व कामगारांनी सातत्याने फक्त संघटनेनेच संघर्ष करावा अन् जे मिळेल ते पदरात पडून घ्यावे, अशी मानसिकता जोपासणाऱ्या शेतकरी आणि कामगारांनी आता अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी सज्ज व्हावे, असे आवाहन जितेंद्र भोसले यांनी केले आहे.

# जनावरांना लंपी रोगाची लागण; नगरपालिकेचे दुर्लक्ष

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

शहरातील मिनी स्टेडियमजवळ तलाठी कार्यालय आणि नगरपालिकेच्या जन आरोग्य केंद्राजवळील मोकाट जनावरांना लंपी रोगाची लागण झाल्याचे दिसून आले आहे. हा रोग संसर्गजन्य असल्याने इतर जनावरांनाही होण्याची शक्यता आहे.

तसेच, तलाठी कार्यालय व जन आरोग्य केंद्राजवळ नागरिकांचा सातत्याने वावर असल्यामुळे या रोगाची लक्षणे मानवांनाही होऊ शकतात का, यावर तर्कवितर्क सुरू आहे. मिनी स्टेडियममध्ये मोठ्या प्रमाणात मोकाट जनावरे आहेत. दिवसभर फिरत राहतात आणि त्यांचे मालक नसल्याने हे जनावरे संध्याकाळी परत त्या ठिकाणी येतात, जिथे शेण आणि मूत्राचा वास पसरेल. या जनावरांपैकी अनेकांना लंपीसारखी रोगाची लागण झाल्याचे दिसून आले आहे.



नगरपालिकेकडे विचारणा केली असता त्यांनी हे काम पशुसंवर्धन अधिकाऱ्यांकडे असल्याचे सांगितले. यावर नागरिकांनी पंचायत समितीच्या पशुवैद्यकीय संवर्धन अधिकाऱ्यांकडे तातडीने पाऊल उचलून रोगग्रस्त जनावरांना योग्य औषध उपचार देण्याची, त्यांना सुरक्षित ठिकाणी किंवा गोशाळेत हलवण्याची आणि नागरिक व जनावरांचे आरोग्य संरक्षित करण्याची मागणी केली आहे.

# लोकशाही असलेल्या देशातच अराजकता



भारताच्या शेजारील देशात भयानक अराजकता माजली आहे. श्रीलंका आणि बांगलादेशात जे घडले, तेच आता नेपाळमध्ये घडत आहे. नेपाळच्या के. पी. शर्मा ओली सरकारने सोशल मीडियावर बंदी घातल्यानंतर तेथील तरुणाईने (जनरेशन-झेड) मोठा उठाव केला. हा उठाव इतका व्यापक होता की पंतप्रधान ओली यांना पदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यांच्या मंत्रीमंडळातील सहकाऱ्यांना आंदोलकांनी पळवून मारहाण केली, धिंड काढली. नेपाळच्या माजी पंतप्रधानांच्या पत्नीला जिवंत जाळण्यात आले. राजकीय नेत्यांची घरे जाळली, सरकारी कार्यालयांना आगी लावण्यात आल्या. संसद व सर्वोच्च न्यायालयही जाळून खाक केले. या आंदोलनात ५१ नागरिक मृत्युमुखी पडले तर १३०० हून अधिक जखमी झाले. नेपाळमध्ये जे घडले तेच काही वर्षांपूर्वी श्रीलंकेत, तर मागील वर्षी बांगलादेशात घडले होते. श्रीलंका आणि बांगलादेशच्या पंतप्रधानांना सत्ता सोडून परदेशात पळ काढावा लागला होता. त्याचीच पुनरावृत्ती नेपाळमध्ये झाली. ओली देश सोडून पळून गेले आणि माजी सरन्यायाधीश सुशीला कार्की यांनी हंगामी पंतप्रधानपद स्वीकारले. बांगलादेशात पंतप्रधान शेख हसीना यांनी भारतात आश्रय घेतल्यानंतर, राजकारणाबाहेरील व्यक्ती मोहम्मद युनूस यांच्याकडे हंगामी पंतप्रधानपद सोपवण्यात आले. नोबेल पुरस्कार विजेते असलेल्या युनूस यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत झाले. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही त्यांचे स्वागत करत, भारत-बांगलादेश संबंध अधिक दृढ होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. मात्र झाले उलटेच. मोहम्मद युनूस लष्कर व मूलतत्त्ववाद्यांच्या नादी लागून भारतविरोधी कारवाया करू लागले. चीन-पाकिस्तानच्या कच्छपी जाऊन त्यांनी भारताच्या विरोधात पावले उचलली. आता नेपाळमध्येही सत्तेची सूत्रे राजकारणाबाहेरील व्यक्तीकडे गेल्याने, बांगलादेशातील घटनांची पुनरावृत्ती होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. नव्या पंतप्रधानांना राजकीय अनुभव नसल्याने ते लष्कर वा इतर शक्तींच्या कळसूत्री बाहुल्या बनतील का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या अराजकतेमागे बाह्य शक्तींचा हात असल्याचे स्पष्ट दिसते. श्रीलंका, बांगलादेश, नेपाळनंतर पुढचा क्रमांक कोणाचा, असा प्रश्न सोशल मीडियावर विचारला जात आहे. काहींचे मत आहे की पुढचा क्रमांक भारताचा आहे. भारतालाही अराजकतेच्या वाटेवर असल्याचे बिंबवण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र भारतातील परिस्थिती वेगळी आहे. कारण भारतीय लोकशाही सुदृढ आहे. येथे नागरिक सुज्ञ आहेत आणि लोकशाही मानणारे आहेत. जगातील सर्वात मजबूत लोकशाहींपैकी एक म्हणजे भारतीय लोकशाही. कमकुवत लोकशाही असलेल्या देशातच अराजकता माजते. भारताची लोकशाही मात्र सक्षम आहे. भारतीय लोकशाहीचे खरे बळ म्हणजे आपले संविधान. अनेक जाती, धर्म, पंथ, भाषा, संस्कृती असूनही भारत एकसंध आहे, ते केवळ बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानामुळे. भारतासोबतच स्वातंत्र्य मिळवलेल्या शेजारील देशांत अनेकदा उठाव, बंड झाले, काही ठिकाणी लष्करशाही किंवा हुकुमशाही आली. मात्र भारतात अजूनही लोकशाही टिकून आहे, कारण येथे लोकांचे राज्य आहे. जोवर आपल्या देशात बाबासाहेबांनी लिहिलेले संविधान आहे, तोवर लोकशाही अबाधित राहील. आणि जोवर लोकशाही आहे, तोवर या देशात अराजकता माजू शकत नाही.




श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
**समाजसंवाद**




**सांगली सार्वजनिक बांधकाम खात्याने इंजिनिअर्स डे रोजी सर्व वर्तमानपत्रांत जाहिराती प्रसिध्द केल्या आणि त्याच दिवशी अत्यंत खराब रस्त्यामुळे अपघात होऊन एक महिला भगिनीचा जीव गेला. याविषयी प्रसिध्द व्यंगचित्रकार रोहित कबाडे यांनी जबाबदारी कोणाची? हे व्यंगचित्र काढले.**

# निरांकुश यांच्या 'सह्यजिनशी' कविता

सह्यजिनशी हा काव्यसंग्रह केवळ शब्दांची कलाकुसरच नाही, तर तो स्वराज्याच्या इतिहास आणि भुगोलाचा उमटलेला एक भावनिक प्रतिध्वनी आहे. यातील प्रत्येक कविता ही उर्जेचा एक प्रवाह आहे. सह्याद्रीच्या उत्तुंग शिखरांसारखीच या संग्रहातील प्रत्येक कविता वाचकाच्या मनाला एका वेगळ्या उंचीवर घेऊन जाते. इथे शौर्य आहे, त्याग आहे, स्वाभिमान आहे आणि त्याचबरोबर काळाच्या ओघात हरवत चाललेल्या मूल्यांची चिंतनपर मांडणीही आहे. कवीने केवळ भूतकाळातील वैभवाचे गुणगान केले नाही, तर वर्तमान स्थितीवरही भाष्य केले आहे, जे या संग्रहाला एक व्यापक परिमाण देते. कवी निरांकुश म्हणजेच अंकुश पाटील यांनी इतिहास म्हणजे केवळ सनावळीतील घटना, किंवा गडकिल्ले म्हणजे केवळ दगडी बांधकाम; या दृष्टीने न पाहता, आपल्या संवेदनशील लेखणीतून इथल्या मातीचा सुगंध, इथल्या इतिहासाचा गौरव आणि इथल्या कणखर माणसांची गाथा शब्दबद्ध केली आहे. त्याबद्दल त्यांचे धन्यवाद.




सह्यजिनशी हे नावच या संग्रहाचा वेगळेपणा दाखवते. सह्याद्रीच्या कडेकपाऱ्यांतून वाहणाऱ्या वाऱ्याप्रमाणेच या कविता आपल्या मनात नवऊर्जा भरतात. ज्या आत्म्याला स्पर्श करतात. या कवितांमधून कवीने महाराष्ट्राच्या गडकिल्ल्यांच्या संस्कृतीचे, तिच्या वारशाच्या चैतन्याचे स्मरण केले आहे.

कविता संग्रह - सह्यजिनशी (सह्याद्रीच्या रक्ताचे वंशज)

**कवि - निरांकुश म्हणजेच अंकुश पाटील, पाने - ९७, प्रकाशक - न्यू ईरा पब्लिकेशन., प्रकाशन - १५ ऑगस्ट २०२५, श्रीमान रायगड, मुल्य - २५०/- रूपये, प्रस्तावना - शरद तांदळेख कविता संग्रहासाठी संपर्क - +९१ ८९८३५३९८६०, ॲमेझॉन, फ्लिपकार्टसह प्रमुख पुस्तक विक्रेत्यांकडे उपलब्ध.**

**शरद तांदळे**
न्यू ईरा पब्लिकेशन, पुणे
**ग्रंथपरिचय**

# अतिवृष्टी नुकसानग्रस्त व्यापारी बांधवांना सरकारने भरपाई द्यावी- जिरेसाळ

**पाथर्डी । रयत समाचार**

अतिवृष्टीमुळे पाथर्डी तालुक्यातील छोटे-मोठे व्यापारी व दुकानदारांचे प्रचंड नुकसान झाले. विशेषतः तळमजल्यावर असलेल्या दुकानात पाणी शिरल्याने किरकोळ ते मोठ्या व्यापाऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. या व्यापाऱ्यांनाही शेतकऱ्यांप्रमाणेच भरपाई देण्यात यावी, अशी ठाम मागणी व्यापारी संघटनेचे बाळासाहेब जिरेसाळ यांनी प्रशासनाकडे केली. पावसाच्या पाण्यामुळे खाण्या-पिण्याच्या वस्तू, स्टेशनरी, कटलरी, इलेक्ट्रॉनिक साहित्य, शैक्षणिक साहित्य, कागद आदी मालसामान भिजून नष्ट झाला. अनेक व्यापारी कर्ज काढून व्यवसाय सुरू ठेवत असताना या अनपेक्षित नुकसानीमुळे कर्जफेडीची चिंता व्यापाऱ्यांवर कोसळली आहे.



दरम्यान, पाथर्डी शहरात नुकतेच केलेल्या बंदिस्त प्लास्टिक पाईप गटाराच्या कामावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पूर्वीचे मजबूत सिमेंट रस्ते व मोठ्या गटारी फोडून छोटे पाईप बसविण्यात आले. त्यामुळे पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी रस्त्यांवर साचले व रस्त्यांनी नद्यांचा चेहरा धारण केला.

योग्य नियोजनाअभावी व्यापाऱ्यांना मोठा फटका बसल्याचे चित्र दिसून आले. या पार्श्वभूमीवर व्यापारी संघटनेने प्रशासनाकडे व्यापाऱ्यांचे नुकसानभरपाईचे पंचनामे करण्याची, तसेच नुकसानग्रस्त व्यापाऱ्यांच्या कर्जाच्या हप्त्यांना किमान सहा महिन्यांची स्थगिती देण्याची मागणी केली आहे. महसूल प्रशासनाने शेतकऱ्यांप्रमाणेच व्यापाऱ्यांनाही दिलासा द्यावा, अशी व्यापारी बांधवांची अपेक्षा आहे.

# जीव धोक्यात घालून पूरग्रस्तांना वाचवणाऱ्या पोलिसांचा मराठा सेवा संघाकडून सन्मान

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

१५ सप्टेंबर रोजी मौजे वडुले येथे अतिवृष्टीमुळे पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. या आपत्कालीन परिस्थितीत गावातील नागरिक पुराच्या पाण्यात अडकले होते. त्यावेळी पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, पोलीस सब इन्स्पेक्टर रामहरी खेडकर, पोलीस कॉन्स्टेबल श्याम गुंजाळ व ईश्वर बेरड (शेवगाव पोलिस स्टेशन) यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता ग्रामस्थांना खांद्यावर घेऊन



सुरक्षित स्थळी पोहोचवले. या धाडसी व कौतुकास्पद कार्याबद्दल मराठा सेवा संघ तालुका शाखेच्यावतीने त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी तालुकाध्यक्ष विजयराव देशमुख, उपाध्यक्ष विष्णुपंत घनवट, पदाधिकारी शरद जोशी, तुषार लांडे, राहुल देशमुख आदी उपस्थित होते.गावकऱ्यांनी व उपस्थित मान्यवरांनी पोलिसांच्या पराक्रमी कार्याचे मनःपूर्वक कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

# शरद पवार यांना धक्का

## अपर विभागीय आयुक्तांनी अतिक्रमण प्रकरणात सरपंचपद स्थगिती अर्ज फेटाळला

**नगर तालुका । रयत समाचार**

तालुक्यातील चिचोंडी पाटील येथील सरपंच शरद खंडू पवार यांनी अतिक्रमण प्रकरणातून स्वतःचे सरपंच पद वाचविण्यासाठी दाखल केलेला स्थगिती अर्ज नाशिकचे अपर विभागीय आयुक्त अजय मोरे यांनी फेटाळला. त्यामुळे जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांनी दिलेला सरपंचपद रद्द करण्याचा आदेश कायम राहिला आहे. ही माहिती माजी पंचायत समिती सदस्य तथा भारतीय जनसंसदचे जिल्हाध्यक्ष सुधीर राजाराम भद्रे यांनी दिली. या प्रकरणात शरद पवार यांच्या बंगल्यासमोर व मागे तसेच एसटी स्टॅण्ड परिसरात अतिक्रमण झाल्याची तक्रार भद्रे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली होती. या तक्रारीची पडताळणी करून जिल्हाधिकाऱ्यांनी पवार यांचे सदस्यत्वासह सरपंचपद रद्द केले होते. मात्र या निर्णयाविरुद्ध पवार यांनी विभागीय आयुक्तांकडे अपील




दाखल केले होते. अपीलात पवार यांच्यावतीने असा दावा करण्यात आला की, बंगल्यासमोरचे अतिक्रमण त्यांना माहीत नाही आणि ते त्या बंगल्यात वास्तव्यासही नाहीत. शिवाय एसटी स्टॅण्डवरील अतिक्रमण स्वतःकडून नसून तक्रारदार भद्रे अथवा इतरांनी केले असल्याचा कांगावा केला. त्यातच चाँद जाफर शेख यांनी अतिक्रमण केले असल्याचे बनावट कागदपत्र दाखल केले. सुनावणीदरम्यान ज्येष्ठ विधिज्ञ सचिन चांगदेव इथापे यांनी ठाम युक्तिवाद करताना, ज्या सरपंचांना स्वतःच्या घरासमोर आणि मागे झालेल्या अतिक्रमणाची माहिती नाही, ते गाव कसे चालवणार? असा प्रश्न उपस्थित केला. अतिक्रमण सिद्ध झाल्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांचा निकाल योग्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अनेक बनावट कागदपत्रे दाखल करून व न्यायालयासमोर कोलांट्या उड्या मारूनही निकाल बदलू न शकल्याने शरद पवार यांना धक्का बसला. न्याय्य आणि निर्दोष निर्णय दिल्याबद्दल अपर विभागीय आयुक्त अजय मोरे यांचे विशेष अभिनंदन केल्याचे सुधीर भद्रे यांनी सांगितले.

# सामाजिक कार्यकर्ते अतुल वामन यांचे निधन





**अहमदनगर । रयत समाचार**


नालेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते अतुल उर्फ राजूभाऊ लक्ष्मण वामन (वय ४२) यांचे १४ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले माजी नगरसेवक गणेश वामन माजी नगरसेविका सोनाली चितळे व छावा संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र युवक सचिव दत्ताभाऊ वामन यांचे चुलत बंधू होते त्यांच्या मागे वडील, बहिण, पत्नी, मुलगा, मुलगी, सासू-सासरे, चुलत भाऊ, चुलत्या, चुलत बहिणी असा मोठा परिवार आहे. त्यांच्या या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.


ICRDILS - 2025
BPHES
AHMEDNAGAR
COLLEGE
Life Sciences
INTERNATIONAL CONFERENCE
RECENT DISCOVERIES AND INNOVATIONS IN LIFE SCIENCES
(ICRDILS-2025)
18th and 19th September, 2025
TITLES OF INVITED SPEAKERS



DR. BHUSHAN PATWARDHAN
Distinguished Professor IIT Kharagpur,
National Research Professor – Ayush & SPPU
Dr. Vijay Khanna Memorial Lecture
Novel Trends in Drug Discovery and Pharmaceutical Research



DR. JAYAPRAKASH MULIYIL
CMC, Vellore
Life in Science: Is it a Pursuit of Fame, Fortune, or Truth?



DR. MANOHAR R. FURTADO
USA
How Pigs are Saving Humans: Xenotransplantation


DR. PORUNELLOOR MATHEW
USA
Advances in Cancer Immunotherapy: CAR-T cell and CAR-NK cell



DR. SHARMILA BAPAT
NCCS, Pune
To be announced soon



DR. CHITRA F. MANOHAR
USA
Advances in Medical Diagnostics for Global Near-Patient Care


DR. SURENDRA GHASKADBI
ARI, Pune
Hydra: Genes, signals, and stem cells An extraordinary research organism and a great teaching tool



DR. SHANKAR SWAMINATHAN
USA
Process Chemistry, Pharma, and FDA



DR. ARVIND A NATU
IISER, Pune
To be announced soon



DR. SHUBHANGEE M. MUNGRE
USA
Immunological Properties of Human Breast Milk



DR. C. K. JOHN
NCL, Pune
To be announced soon



DR. RAHUL BHAMBURE
NCL, Pune
To be announced soon


DR. RAGHAVENDRA P. GAIKAIWARI
HTBS, Pune
Biocatalysis - An Industrial Perspective


DR. S.T. LONKAR
Envocare Research & Eng. Pvt Ltd.,Pune
Environmental Pollution, Monitoring, and Analysis


DR. SUJEETH NEERAKKAL
Ireland
A sustainable innovation designed to enhance crop resilience in response to climate change


DR. CRISTINA B. LLAMERO
Spain
To be announced soon


DR. J.R. KUMAR
JSS AHER, Mysuru
Unveiling the Functional Mechanisms of Russell's Viper Snake Venom Phospholipase $A_2$


DR. SHIVARAJU H.P
JSS AHER, Mysuru
Sustainable Solutions: Addressing Antimicrobial Resistance and Environmental Health Challenges

**INTERNATIONAL CONFERENCE on RECENT DISCOVERIES AND INNOVATIONS IN LIFE SCIENCES Sep 18,19 2025**

This Conference is organized by the Life Sciences Departments of B.P. Hivale Education Society's Ahmednagar College, in collaboration with former students from The John Barnabas Post-Graduate School for Biological Sciences, and is pioneering landmark event in the field of Life Sciences. Scheduled to take place on September 18-19th this conference will bring together leading scientists, researchers, teachers, and industry professionals from India, USA, Italy and other countries to explore innovations shaping the future of Life Sciences.

The conference is designed to showcase the breadth of potential opportunities in the Life Sciences to students, teachers, researchers. We are working with both academics and industry leaders to highlight opportunities in academic research & in Industry.

**Global Participation**
The Conference has **350+ registrations** across various categories, including physical participation (oral and poster presentations), online presentations, and online form most states in India and other countries like USA, Italy,

**REGISTRATION FORM WITHOUT ABSTRACT**
**https://forms.gle/ZCcJfTwYztUtJTit5**
**Contact: Dr. Ivan Aranha,** Organizing Secretary, Mobile : + 91 98457 00052
Email:international.conference.2025@aca.edu.in

**Available on Ahmednagar College YouTube Channel**